जा.क्र.वि.शा./निवडणूक/ १०४५२/२०१७
पोलीस उप-आयुक्त विशेष शाखा-०१,
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- २१/१२/२०१७

<u>विषय</u> :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे** जे ज्या वॉर्डाचे मतदार नाहीत त्यांनी त्या वॉर्डात न थांबणेबाबत आदेश.

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता, वेल्हे जि. पुणे ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान होणार आहे. व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्रमांक४६४/आय.एन.एस.टी./२००७/पी.एल.एन.-१/दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकिय व्यक्तींवर जर ते त्या वॉर्डातील मतदार नसतील तर त्या वॉर्डात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकिय व्यक्तींना किंवा राजकिय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या वॉर्डाचे मतदार नाहीत त्या वॉर्डात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, **रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता, वेल्हे जि. पुणे या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीचे मतदान केंद्रे (इमारती) व बुथवर दिनांक २४/१२/२०१७ रोजी १८.०० वा. पासून ते मतदान प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

१) सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या वॉर्डाचे मतदार नाहीत त्या वॉर्डात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.सं.कलम १८८ अन्वये कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक २१/१२/२०१७ रोजी देणेत आला आहे.

**(रविंद्र कदम)**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर.

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २१/१२/२०१७**

**<u>पोलीस नोटीस प्रसिध्दी</u>**

जा.क्र.पोउआ/वि.शा./राजकीय/ /१७
पोलीस उप-आयुक्त विशेष शाखा-१
पुणे शहर यांचे कार्यालय,
दिनांक :- २१/१२/२०१७

**प्रति,**
**सहायक पोलीस आयुक्त,**
**प्रशासन,पुणे शहर**

**<u>विषय</u> :-** पोलीस नोटीसमध्ये सी.आर.पी.सी. १४४ प्रमाणे आदेश प्रसिध्दी होणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, माहे डिसेंगर २०१७ या कालावधीत मुदत संपणा-या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणुक आयोगाने जाहीर केला आहे. तरी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस ठाणे हददीतील कुरण बुद्रूक या ग्रामपंचायतीची निवडणूक होणार असून त्याचे अनुषंगाने जारी केलेले सी.आर.पी.सी. १४४ प्रमाणे आदेश एकूण ०२ यासोबत सॉफट कॉपी व हार्ड कॉपी असे जोडले आहेत.

तरी सदर आदेशांची पोलीस नोटीस मध्ये प्रसिध्दी करणेस विनंती आहे.

राजकिय विभाग, विशेष शाखा-१,
पो.उ.आ.वि.शाखा-१, पुणे शहर करीता.